# वीर मरणाची प्रतीक्षा करणारा राजगुरू!

शिवराम हरी राजगुरू! भगतसिंग-राजगुरू-सुखदेव! एकाच व्यक्तीचे नाव असावे अशी जोडून घेतली जाणारी नावे! साऱ्यांचे वेगळे व्यक्तिमत्व! अत्यंत भिन्न व्यक्तिमत्वाचे असले तरी सारे निखळ वीर! साम्य अणीशुद्ध देशभक्तीत! अनोख्या शौर्यात! सारे देशासाठी जीवाची कुरवंडी करण्यास उतावीळ झालेले! ज्याच्या अनेक पिढ्या देशभक्तीत रमल्या; तो भगतसिंग, हौतात्म्य पत्करण्याची घाई असलेला राजगुरू आणि तीव्र बुद्धीचे वरदान लाभलेला सुखदेव थापर! जणू एका नाण्याच्या तीन बाजू! सामान्यत: नाण्यास दोन बाजू - राजा नि काटा असतात असे मानतात. पण राजा नि काटा ज्याच्यावर निर्भर असतात त्या तिसऱ्या बाजूकडे - नाण्याच्या जाडीकडे दुर्लक्ष होते. भगतसिंग नि राजगुरू कार्यकर्ते! कार्य योजनेवर निर्भर असते. योजनांची आखणी करणारा सुखदेव थापर!

शिवराम हरी राजगुरूचा जन्म १९०९ साली खेड यागावी झाला. पण त्याचे घर पुण्यास होते. या बालकास अगम्य कारणामुळे, सुरुवातीपासून इंग्रज नकोसे वाटत. म्हणून इंग्रजी भाषेचाही तिटकारा! देशात ब्रिटीशांचे राज्य! शाळेत इंग्रजी भाषा शिकावीच लागे. परिणाम पहिल्या प्रकरणात आहेच. बुद्धीचा अभाव नसूनही त्याने कधी इंग्रजीचा अभ्यास केला नाही. त्यामुळे त्याला घरात वारंवार ऐकून घ्यावे लागे. तो १४ वर्षाचा असताना दिवाळीत मोठ्या भावाने त्याला वडिलकीच्या नात्याने वहिनीच्या उपस्थितीत इंग्रजीकडे दुर्लक्ष करणे हिताचे नाही, असे खडसावून सांगितले. साक्षात दिवाळीत वहिनीसमोर झालेला अपमान त्याला झोंबला. त्यावेळी खिशात रॉकेल आणण्यास दिलेले ९ पैसे होते. त्याला अंजिरे आवडत. म्हणून ताईने अंजिरे खाण्यास दोन पैसे दिले होते. या अकरा पैशाच्या भांडवलावर त्याने १९२३ सालच्या नर्कचतुर्दशीस नेसत्या वस्त्रानिशी घर सोडले.

करकरीत संध्याकाळी कुमार शिवराम घराबाहेर पडला. त्याने पुणे स्टेशन गाठले. स्टेशन बाहेरील बाकावर बसून रात्र जागवली. पुणे शहरात दिवाळीच्या निमित्ताने फटाके वाजत होते तेव्हा कुमार शिवरामच्या डोक्यात इंग्रज विरोधाचे भुईनळे फुटत होते. आज ज्याला 'टीन एज कॉम्प्लेक्स'चा आडमुठेपणा म्हणतात तो भरास आला. अबोध आणि समंजसपणा यांच्या उंबरठ्यावर अडखळणाऱ्या त्या कुमाराच्या डोक्यात वयास न शोभणारे विचार धुमाकूळ घालू लागले. हा देश म्हणजे आपले घर! परके इंग्रज घरात घुसले आणि पाहुणचार स्वीकारायचे सोडून ते आपल्याला गुलाम बनवून राज्य करत आहेत. त्यांची मते लादत आपल्या मतांचा अवमान करत आहेत, असे त्यास वाटत होते. रोष वाढत होता. ज्या घरात अशा मतलबी पाहुण्यांचा कैवार घेऊन मोठ्या भावाने वहिनीच्या देखत अपमान केला, त्या घरी जायचे नाही. ज्यांच्यामुळे हा अपमान झाला, त्या इंग्रजांना या देशातून हुसकून लावल्याविना तर अजिबात नाही, असा त्याने निश्चय केला. घरी न जाण्याचा विचार पक्का झाला तोवर पहाट झाली होती. नव्या विचारांचा सूर्य उगवत असल्याचा थरार त्यास मोहवून गेला. नकळत तो उठला आणि घराच्या विरुद्ध दिशेस चालू लागला.

परक्या इंग्रजांची हकालपट्टी करण्याचा घोर निश्चय करून तो तरातरा चालत सुटला. खडकी गाठेतो दुपार झाली. तिथे त्याने दोन पैसे खर्चून चणे घेतले. ते खाल्ल्यावर अर्धे पोट भरले. उरले अर्धे पोट घटाघट पाणी पिऊन भरले. दोन पैशाच्या चण्यांवर त्याने उरला दिवस काढला, इंद्रायणीच्या काठावर कुणी त्याला थोडी फळे दिली. लक्ष्मीदेवीचा प्रसाद समजून त्याने त्यावर लक्ष्मीपूजन साजरे करून जन्मगाव गाठले. अमावास्येच्या रात्री एका मंदिराच्या पूजाऱ्याने ओसरीत त्याला झोपण्याची परवानगी दिली.

सकाळी पुन्हा पदयात्रा! नारायणगाव, बोटगाव, नांदूर... मजल दर मजल करत त्याने नाशिक गाठले. पोटाची खळगी भरायला कधी ग्रामस्थाने प्रेमाने दिलेले भोजन कामी आले तर कधी रस्त्यात उताऱ्याच्या वर्तुळात ठेवलेल्या दही-भातावर गुजराण करावी लागली. अशा भातावर गुलाल असे. तो पाण्याने धुतल्याने दही-भात बेचव होई. पण डोक्यातली आग फालतू विचारांना स्थान देईनाशी झाली होती. कधी इंग्रजीचा तिरस्कार काशीस जाऊन संस्कृत पंडित होण्याची इच्छा जागृत करी तर कधी तात्याराव सावरकरांच्या पावलावर पाऊल टाकण्याची इच्छा तीव्र होई. स्वातंत्र्यवीर सावरकरांविषयी त्याच्या घरात आदराने बोलले जाई. त्यांची सशस्त्र क्रांतीच्या संदर्भातील मते आणि त्यासाठी वीरमरण प्राप्त करण्याची त्यांची प्रतिज्ञाही तो जाणून होता. म्हणून आधी नाशिकला जावेसे वाटले. नाशिकमध्ये सावरकांची भेट घडणे शक्य नव्हते, तरी त्यांच्या घराची पायरी पुजून त्याने काशीक्षेत्राच्या दिशेने कूच चालू ठेवली. निग्रहाच्या बळावर तो काशीस पोहोचला आणि त्याची इच्छा विचित्र रीतीने पूर्ण झाली.

काशी विद्यापीठात त्याने प्रवेश मिळवला. अष्टाध्यायी संहितेचा अभ्यास सुरु केला. पण त्या काळी कलकत्ता, पटणा, बनारस, कानपूर, झाशी, दिल्ली. मेरठ, लाहोर वगैरे शहरे क्रांतीवीरांचे अड्डे बनली होती. देशाचा समग्र उत्तर भाग क्रांतीच्या तेजस्वी ज्वाळेत लपेटलेला होता. तरुणाई हौशीने स्वत:स त्यात झोकून देण्यास उत्सुक होती. काशी हिंदू विद्यापीठाचे पंडित मदनमोहन मालवीय क्रांतीवीरांचे श्रद्धास्थानच नव्हे तर खात्रीचे आश्रयस्थान आणि गुप्त केंद्र बनले होते. अशावेळी इंग्रजांचा तिरस्कार करणारा शिवराम राजगुरू काशी विद्यापीठात दाखल झाला. संस्कृत पंडित होण्याच्या इच्छेस दूर ढकलून निखळ क्रांतीवीर जन्मास येणे ही स्वाभाविक घटना होती.

काशी विद्यापीठात शिवराम राजगुरूस सारे बापू नावाने ओळखत. तो हनुमान आखाड्याचा व्यायाम विशारद होता. त्याने सेवादलात प्रशिक्षण घेतले होते. त्याचा देह अत्यंत मजबूत होता. काशी विद्यापीठात बापूला क्रांतीचे अध्वर्यू चंद्रशेखर आझाद भेटले. बापूचा बांधा सणसणीत! स्थूलतेकडे अजिबात न झुकणारा! मस्तकात धुमसणारा इंग्रजां-बद्दल तिरस्कार! ते खुश झाले. परिचय होईल त्यास क्रांतीचा रंग लावण्यात आझाद निष्णात! बापू सावरकरांचा पूजक! एकमेकांच्या प्रेमात ते पागल न होते तरच नवल! आझादांनी बापुची सांगोपांग परीक्षा घेऊन त्याचे गुणाव-गुण पारखले आणि लीलया प्रखर क्रांतीवीर निर्माण केला. बापू आझादांच्या सशस्त्र क्रांतीचा अनुरोध करणाऱ्या पार्टीचा अधिकृत सभासद झाला. मग त्याला "तुझे काम असेल तेव्हा कळवेन," असे आश्वासन देऊन आझादांनी निरोप घेतला.

बापूने काशीत कॉर्पोरेशनच्या शाळेत व्यायाम शिक्षकाची नोकरी पत्करली. काही दिवसांनी पार्टीचा एक कार्यकर फितूर असल्याचे कानावर आले. तो सरकारला गुप्त माहिती पुरवत असल्याची खात्री पटली. स्वाभाविकच आझादांनी त्याचा काटा काढणे योग्य ठरवले. त्या कामासाठी त्यांनी बापुची निवड केली. कानपूरला शिकणाऱ्या शिव वर्माने त्यास मदत करावी, असे ठरले. म्हणून त्यांनी शिव वर्मास बापूला तसे कळवण्यास काशीस पाठवले.

राजगुरू नावाचा माणूस राजस सुकुमार असणार, अशी शिव वर्माची अपेक्षा! निदान तो नाकीडोळी नीटस आणि उजळ वर्णाचा असणार, अशी त्याला खात्री वाटली. आझादांचा बापूला निरोप सांगण्यासाठी तो कॉर्पोरेशनच्या शाळेत गेला. पण त्याला राजगुरू सापडला नाही. म्हणून त्याने शाळेच्या कचेरीत विचारले. राजगुरूस कचेरीत बोलावण्यात

आले. आलेल्या व्यक्तीस पाहून शिव वर्मा थक्क झाला. कारण मुळात बापू काळा! मजबूत! पण मधल्या काळात खाण्या-पिण्याचे हाल आणि उन्हातान्हात रखडपट्टी झाल्याने तो कुरूप झाला  होता. अर्थात त्याच्या रूपाशी शिव वर्मास कर्तव्य नव्हते. बापूस घेऊन तो नदीकिनारी गेला. एकांतात परवलीच्या गुप्त शब्दाची देवाण-घेवाण झाली. वर्माने त्याला अॅक्शन प्लान सांगितला. बापूने होकार दिला. बापूची निर्विकार मुद्रा पाहून शिव वर्माला त्याच्या साहस आणि समर्पणाबाबत शंका वाटली. पण आझादांनी बापूच्या अचूक  लक्षवेधाची तारीफ केली होती. आझादांच्या रत्नपारखी नजरेवर विश्वास ठेऊन त्याने कटू शब्द गिळले. दोघे तातडीने दिल्लीस गेले.

शिव वर्माकडे एक बंदूक होती. पण बापूचे हात रिकामे होते. शिवाय गद्दारास आझादांना आपल्या काळ्या कामाचा सुगावा लागला आहे, हे कळल्याची खबर मिळाली. म्हणजे अधिक सतर्कता आवश्यक! आता घाबरलेला गद्दार घरात लपून राहू लागला. अर्थात त्याचे निवासस्थान शिव वर्मास ठाऊक होते. फितूर क्रांतीकारी घराबाहेर पडेल, या प्रतीक्षेत वेळ बरबाद करणे वर्मास अयोग्य वाटले. राजगुरूस दिल्ली अपरिचित! म्हणून बापूने बंदूक घेऊन फितूर माणसाच्या घराजवळ दबा धरून बसावे, असे वर्माने सुचवले. काम बापूस सोपून आपण अजून एक पिस्तुल मिळवण्याचा प्रयत्न करावा असा वर्माचा मानस होता. सायंकाळी सात-आठच्या सुमारास गद्दार विशिष्ट ठिकाणी जाणार असल्याची बातमी मिळाली. म्हणून सकाळी  वर्मा  बंदूक मिळवण्यास दिल्ली  खुंदळू लागला. त्याची बंदूक घेऊन डोळ्यात तेल घालून बापू फितुराच्या घराच्या दरवाजाचा वेध घेत होता. दोन दिवस हेच चालले. वर्मास बंदुक मि ळाली नाही. म्हणून तिसऱ्या दिवशी  सायंकाळपर्यंत परतण्याच्या उद्देशाने पहाटे वर्मा बंदूक मिळवायला लखनौस गेला. बापू धीराने दबा धरण्याचे काम इमाने इतबारे करीत होता. संध्याकाळी वर्मा दिल्लीस परतला. बापू घरात नव्हता. तो गद्दाराच्या घराशी असेल, या खात्रीनिशी वर्मा तिकडे निघाला; पण तिथे पोहोचला नाही. कारण दिवस मावळला होता. रस्त्यात पोलीस सर्च लाईट्स लावून कसलासा शोध घेण्याचा जीवापाड प्रयत्न करताना दिसले. बापूचे काम फत्ते झाल्याची खात्री झाली आणि वर्मा उलट पावली परतला. मात्र मुक्कामाच्या ठिकाणी न जाता त्याने कानपूरकडे मोहोरा वळवला.

अचूक नेमबाजीसाठी बापूचे नाव घेतले जाई. त्याने गोळी झाडली, म्हणजे समोरचा झोपणार, अशी त्याची ख्याती! गद्दार मेला की नाही, हे बघण्याची तसदी न घेता गोळी झाडून बापू मथुरा रेल्वे  लाईनच्या दिशेने धावत सुटला. रेल्वे लाईनला समांतर राहून तो वेगाने धावू लागला. पोलिसांच्या कर्कश्य शिट्या वाजत होत्या. गोळ्यांच्या फैरी झडत होत्या. पण बापू ज्याचे नाव आणि नेमके करण्यात पटाईत असणे ज्याचे काम, तो श्वासाची उसंत न घेता, मोकाट धावत होता. पोलिसांच्या सर्च लाईटचा झोत त्याचा पिच्छा करत होता. लपण्यास  योग्य जागेचा पूर्ण अभाव! म्हणून मथुरा रेल्वे लाइनच्या खाली असलेल्या शेतात जाण्याचा विचार करून त्याने उडी मारली. शेतात खूप पाणी होते.  ते अंधारात  कळले नाही. कळले असते तरी दुसरा सुरक्षित पर्याय उपलब्ध नव्हता.

बापूने ज्या शेतात उडी घेतली, ती साक्षात दलदल होती. उंचावरून शेतात कोसळलेला बापू, त्या दलदलीत अक्षरश: रुतला. पोलीस मागावर होतेच. बापूने अंधारात उडी घेतली असली तरी तो परीसर न्याहाळणाऱ्या पोलिसांच्या हाती सर्च लाईट्स होते. ते तीन-चार तास शेताच्या चिखलात मानवी हालचाल दिसते का, ते डोळ्यात तेल घालून बघत होते. थंडगार चिखलात बापू हालचाल न करता चिडीचूप पडून राहयला. मच्छरांची फौज मानवी रक्ताची मेजवानी झोडत होती. बराच वेळ शेतात मानवी हालचाल दिसली नाही, म्हणून काही पोलीसांना शेतात उतरविण्याची व्यवस्था

झाली. त्यांना तिथे खोल दलदल असल्याची जाणीव झाली. वर आल्यावर त्यातील एकजण चेष्टेच्या सुरात म्हणाला, "इतना समय कोई इस ठंडकमे जिंदा नही रह सकता. कल दिनके उजालेमे लाशको बरामत करने आएंगे. अब वापस जानाही ठीक रहेगा."

कुणी म्हणाले की दलदल इतकी खोल आणि थंड आहे की मध्ये पडलेल्या जिवंत माणसाचे प्रेतही आखडून जाईल. साऱ्यांचे एकमत झाले आणि पोलिसांनी शोध थांबवला. खूप वेळ सर्च लाईटचा प्रकाश दिसला नाही. आता पोलीस गेले असतील, असा बापूने तर्क केला. तरी अतिरिक्त सुरक्षेस प्राधान्य देऊन तो काही वेळ दलदलीत पडून राहयला. उंचावरून उडी घेतल्याने बापू दलदलीत खोल उतरला होता. चिकट चिखलातून बाहेर पडण्यासाठीही फार प्रयत्न करावा लागला. मग पुन्हा अंधारात दौड सुरु झाली. भरधाव पळत त्याने दोन स्टेशन्सचे अंतर कापले. तिसऱ्या स्टेशनच्या फलाटावर नळ होता. पाण्याने त्याने अंग आणि कपड्यांवरचा शक्य तितका चिखल दूर केला आणि तो मथुरेच्या गाडीत शिरला. मथुरेस नदीच्या पाण्यात खऱ्या अर्थाने कपडे धुतले. ते वाळेतो तो उघड्या देहाने नदीच्या वाळवंटात पडून राहयला.

घटीताच्या तिसऱ्या दिवशी बापू कानपूरला पोहोचला. शिव वर्मास भेटून त्याने अहवाल सादर केला. बापूचा भीम पराक्रम आणि तरी विशेष काही न केल्याचा अभिनिवेश पाहून वर्मा थक्क झाला. दुर्दैवाने बापुची गोळी ज्याचा छेद उडवून गेली, तो इच्छित फितूर नव्हता. एका निर्दोष माणसाची आपल्या हातून हत्या झाल्याचे कळताच बापूचे डोळे पाणावले. पण गद्दार माणसास घरी आसरा देणारी व्यक्ती निर्दोष नसते, असे सांगून वर्माने त्यास चुचकारले. तरी खूप वेळ भावनाप्रधान बापूची हळहळ कमी होईना. त्याचे अश्रू पुसण्यात वर्माची दमछाक झाली.

चुकीचा माणूस मेला तरी या प्रसंगात त्याचे कौशल्य व समर्पण सिद्ध झाले. पार्टीच्या आघाडीच्या क्रांतीवीरात त्याची गणना झाली. रघुनाथ नाव धारण करून तो हिरीरीने क्रांतीकार्य करू लागला. त्याची देशभक्ती आणि साहस अनोखे असले तरी प्रत्येक साहस स्वत: करण्याचा आग्रह बालिश तर कधी त्रासदायक ठरे. वय कुमार नि तरुणावस्थेच्या उंबरठ्यावर! त्याची अणीशुद्ध देशभक्ती सर्वांच्या आदराचा विषय असल्याने कुणी त्यास दुखवत नसे. तरी नजरेत भरणारा त्याचा अजून एक अवगुण कार्यकर्त्यांना जोखमीचा वाटे. त्याची झोप गाढ! कुंभकर्णाची झोप साऱ्यांना अडचणीत आणील, असा विचार खूपदा चर्चेत असे. म्हणून काही ॲक्शन प्लानमधून त्याचे नाव दूर केले जाई.

सशस्त्र क्रांतीचा हिरीरीने अनुरोध करणाऱ्या आणि आझादांच्या नेतृत्वाखाली काम करणाऱ्या आघाडीच्या क्रांतीवीरात भगतसिंग, राजगुरू, सुखदेव थापर, सिन्हा, माहोर, वैशंपायन, वगैरेंचा समावेश होता. सारे विविध नावे धारण करून गुप्त कारवाया करत. त्यात राजगुरू उर्फ बापू अति उत्साही! प्रसंगी त्याचा उत्साह आणि घाई इतरांची डोकेदुखी ठरे. आघाडीचे इतर क्रांतीकारी उत्तरेचे! म्हणजे लख्ख गोरे आणि देखणेही! बापू काळा! कुरूप म्हणण्याजोगा! मराठी भाषक! इंग्रजीचा तिरस्कार करणारा! हिंदी, इंग्रजी आणि उर्दू बोलणाऱ्या गटात तो हिंदी नाव देत जे बोलत असे ते अत्यंत विनोदी ठरे. कधी कधी तो काय म्हणतो आहे, याचा कुणाला उमज पडत नसे. सारे तरुण! प्रसंगी एकमेकांची फिरकी घेणारे! त्यात गुलाबी चेष्टेचाही समावेश असे. पण बापूला रसिकता, तारुण्यसुलभ विजातीय आकर्षण सारे वर्ज्य! तो म्हणत असे, "हौतात्म्य रमणीरुपात आले तर सर्वात पुढे राहून मी वरमाला घालणार!" म्हणून सारे शहादत त्याची महेबुबा आहे, असे म्हणत. या बाबतीत तो भगतसिंगला आपला दुश्मन

समजे. त्यास दरडावून सांगत असे, "खबरदार माझ्या आधी फाशी गेलास तर!" फाशी जाण्याची त्याला इतकी घाई होती की चेष्टेने सारे त्यास 'शहादतके बेताब बादशहा' म्हणत. त्यालाही चेष्टा मस्करी करणे आवडत असे. गंभीर विषयावर चर्चा भरास आली असताना तो मधेच आपल्या धेडगुजरी भाषेत विनोदाच्या फुसकुल्या सोडून साऱ्यांचा रोष ओढवून घेत असे. मग सारे "तू चूपबे" म्हणत कालवा करत.

क्रांतीच्या कष्टप्रद जीवनात रघुनाथसाठी निद्रा ओॲसिस ठरे. एकदा का ब्रह्मानंदी टाळी लागली की तो जणू दुसऱ्या जगात पोहोचत असे. निर्भयपणा आणि अचूक नेमबाजीसाठी विख्यात असलेला राजगुरू अघोरी झोपेसाठी कुख्यात होता. त्याची झोप सर्वांच्या चेष्टेचा, कधी काळजीचा तर प्रसंगी रागाचा विषय ठरे. हे अतिशयोक्ती वा अकारण नव्हते. निद्रप्रेमामुळे घडलेल्या दुर्घटनांमुळे त्याच्या कर्तृत्वाविषयी आदर असूनही कुणाला विश्वास वाटत नसे. अटीतटीच्या क्षणी याला गाढ झोप लागली तर, हा भयप्रद प्रश्न या सर्व निर्भय वीरांना सतावत असे.

एकदा बापू आणि भगतसिंग एका योजनेसाठी प्रवासास निघाले. दिवसभर भगतसिंग दुसऱ्या कामात गढला होता. काम थकवणारे होते आणि गाडी रात्री दोन वाजता! उशिरा वाहनाची व्यवस्था नव्हती. म्हणून रात्री नऊ वाजता दोघे स्टेशनवर गेले. भगतसिंगला आता खऱ्या परिक्षेची वेळ वाटली. थकव्यामुळे डोळा लागण्याची भीती! संगती झोपेचा शहेनशाह! भगतसिंग नेटाने डोळे उघडे ठेवत होता. तो पापण्यांना खेचून उघड्या ठेवत असल्याच्या संशयाने बापूने चिडून विचारले "इतकी झोप येतेय तर झोपत का नाहीस?" भगतसिंगने गाडी चुकण्याचे भय ओठी आणले नि बापूचा रोष आकाश भेदून गेला. "क्यो बदनाम करते रहते हो मुझे? कुंभकर्णका भाई नही मै! तुम जागो या सो जाव. मै पलभरभी आंख बंध करनेवाला नही!" बापूने प्रेमाने फलाटाच्या बाकावर सतरंजी हंतरली. भगतसिंग कमालीचा थकला होता. डोळे पापण्यांचा भार उचलायला अजिबात तयार नव्हते. म्हणून बापूला नक्की जागा राहा आणि एक-दीडच्या सुमारास उठव, असे सांगून तो आडवा झाला. काही वेळाने त्याला जाग आली तरी डोळे बंद होते. स्टेशनच्या घड्याळात ठोके पडू लागले. बारा वाजले असावेत असे समजून तो डोळे मिटूनच ठोके मोजू लागला. पण चार नंतर ठोका पडेना. म्हणून डोळे किलकिले करून त्याने घड्याळाकडे बघितले आणि त्याच्या काळजाचा ठोका चुकला. चार वाजले होते. गाडी केव्हा आली आणि केव्हा गेली ते थकून झोपलेल्या त्याला कळलेच नव्हते, त्याने चिडून आसपास बघितले. फलाटावर मुटकुळे वळून पडलेल्या बापूचा घोरासूरी राग रंगात आला होता. संतापलेल्या भगतसिंगने चिडून त्याच्या पेकाटात जोरदार लाथ हाणली. पण त्या लाथेत निघून गेलेल्या गाडीस परत आणण्याचे सामर्थ्य नव्हते.

रघुनाथ केव्हा आणि कोणते साहस करील, त्याचा तर्क करणे केवळ अशक्य असे. त्याच्यावर प्रेम असल्याने साऱ्यांना काळजी वाटे. एकदा तो घरात कुठेही दिसेना. त्याला विशिष्ट कामासाठी पाठवलेले नव्हते. म्हणून ते काळजीत पडले. कुणीसे म्हणाले, "आपण त्याची फार फिरकी घेतो. तो रुसून निघून गेला नसेल? रागाच्या भरात त्याने भलते सलते केले नाही, म्हणजे मिळवली." ही शंका साऱ्यांना हलवून गेली. काहींनी शरमिंदगी व्यक्त करून या पुढे मजाक न करण्याची त्याच्यापुढे कसम खाण्याची तयारी दर्शवली. सारे हळहळत असताना बाहेर गेलेला एक क्रांतीवीर परतला. झब्बा काढून त्याने खुंटीवर अडकवला. त्या खुंटीवर आधीच इतके कपडे होते की झब्ब्यासह सारे कपडे पडले. खुंटी वरून आधी पडलेले खूप कपडे होते. झब्ब्याबरोबर सारे कपडे उचलताच खाली बापू घोरत पडलेला दिसला.सारे चिडले. मजाक न करण्याच्या निश्चयास धाब्यावर बसवून ते बापूला गुद्दे मारू लागले. डोळे न उघडता तो बरळला, "सोने क्यो नही देते यार?" त्याच्या या झोपेसाठी साऱ्यांनी त्याला 'निद्रानवाब' हा किताब अर्पण केला.

पण गाडीची शिट्टी, बँडबाजा वा मोठमोठ्याने चालणाऱ्या वाह्यात गप्पांच्या आवाजाने ज्याचा निद्राभंग होत नसे तो राजगुरू ॲक्शन शब्द कुजबुजल्यागत उच्चारला तरी गाढ झोपेतून जागा होई. प्लानवर झडप घालण्याची त्याला घाई होई. त्यामुळे आझादांना तो फार प्रिय होता. पण ज्यास हायपर वा शॉर्टर्ड म्हणतात तसे त्याचे सतत अस्वस्थ असणे त्यांना धोक्याची जाणीव करवत असे. विशेषत: तो भूमिगत असताना त्याचा उन्माद आणि भान विसरून आवेशाने बोलत सुटणे संकटास आमंत्रण ठरू शकेल, असे म्हणत ते बरेचदा त्याच्या उत्साहावर पाणी ओतत. त्यास पोलिसांकडे नजर ठेऊन सतर्क राहण्याचा सल्ला देत. आपण भूमिगत आहोत याचे भान सुटू देऊ नकोस, असे सांगत. कारण उत्साहाच्या भरात आपण कोणते नाव धारण केले आहे नि कुठे आहोत याचे त्यास विस्मरण होत असे. अशावेळी त्याच्याबरोबरच्या क्रांतीवीरासाठी पंचाईत - जोखीम निर्माण होत असे. त्याला भानावर आणणे लोखंडाचे चणे चावण्याचे काम असे.

एकदा आझाद आणि माहोर बरोबर तो कानपूरहून झाशी रेल्वेत प्रवास करत होता. प्रवासात गुप्त हेर नि पोलिसांना चकवण्यास ते टपोरी मवाली बनले होते. काल्पी पार करून गाडी बुंदेलखंडाच्या पर्वतीय प्रदेशात शिरली. राजगुरूचे भान हरपले. तो मनाने सह्याद्रीच्या पर्वतमालेत पोहोचला. मनात शिवाजी महाराजांचे लोकोत्तर कार्य धुमाकूळ घालू लागले. सामान्यत:ही तो मोठ्याने आणि तार सप्तकात बोलत असे. महाराजांच्या कर्तृत्वाच्या चित्तरकथा सांगताना त्याचा सूर अधिक वर चढू लागला. गाडीत प्रवाश्यांची बऱ्यापैकी गर्दी होती आणि राजगुरूचे बोल मवाल्यास शोभेसे नव्हते. वस्तुत: पार्टीचे कमांडर इन चीफ सोबत असताना अधिक सतर्क असणे आवश्यक असते. पण महाराजांचे गुण गाताना राजगुरूची ब्रह्मानंदी टाळी लागली. आझाद आणि माहोर त्याला शांतवण्याचा जीवापाड प्रयत्न करत होते. पण राजगुरूचा उन्माद घटत नव्हता. तो स्थळ-काळाचे भान विसरून शिवाजी महाराजांची थोरवी गात होता. महाराज बुंदेलखंडात पोहोचते तर काय बहार आली असती, म्हणत मिटक्या मारत होता. त्याला आवरणे आझाद वा माहोर कुणाला जमेना. म्हणून त्यांनी त्याच्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करण्याचा विचार केला. तरी त्याचे डोळे उघडले नाहीत. तो कधी माहोर तर कधी आझादांच्या मांडीवर तर कधी खांद्यावर थाप मारून त्यांचे लक्ष वेधू लागला. मग मात्र आझाद वैतागले. अस्सल टपोरी शैलीत त्यांनी कचकचून शिवी हासडली. राजगुरू एकदम स्तब्ध झाला. झाशीस आझाद राजगुरूवर आग ओकतभरल्या डोळ्याने म्हणाले, "आज इसकी वजहसे मुझे शिवाजी महाराजको गाली देनी पडी."

अटीतटीच्या वेळी भगतसिंग साहेब बनून प्रवास करणार होता. राजगुरू - रघुनाथ त्याचा नोकर असणार होता. आपापल्या भूमिकेत दोघे स्टेशनवर पोहोचले. भगतसिंग ऑफिसरच्या तोऱ्यात ताठ चालत होता. रघुनाथ नोकर! त्याच्या डोक्यावर सामान! पण रघुनाथ आपली भूमिका विसरला. त्याला भगतसिंगशी बरोबरीच्या नात्याने गप्पा हाणण्याची सुरसुरी आली. भगतसिंगच्या खांद्याला खांदा भिडवून तो गप्पा छाटू लागला. त्याला त्याची जागा दाखवण्यासाठी भगतसिंगने वेग वाढवला. डोक्यावर सामान असलेल्या रघुनाथला इतके वेगाने चालता येणार नाही आणि तो नोकरास शोभेसा मागे पडेल, हा त्याचा हेतू! पण रघुनाथ धापा टाकत वेगाने चालू लागला. रघुनाथला त्रास होऊ नये यासाठी भगतसिंगने वेग कमी केला. पण नोकराची भूमिका विसरलेला रघुनाथ त्यास हिणवत म्हणाला, "बस इतनेमे थक गये? फिर आगे क्या करोगे?" कुणाला संशय येण्याची शक्यता होती. आता रघुनाथला ताळ्यावर आणावेच लागेल याची भगतसिंगला जाणीव झाली, त्याने फक्कड इंग्रजीत रघुनाथला सुनावले, "लुक हिअर सर्वंट, यु

हॅव टू सीट इन डीफरंट कंपार्टमेंट.” इंग्रजी आवडत नसले तरी सर्वंट शब्दाने त्यास वास्तवाचे भान करून दिले. तो खाली मान घालून चालू लागला.

एकदा रघुनाथाला साऱ्यांसाठी रोट्या बनवण्याचे काम सोपण्यात आले. त्यानुसार तो रोट्या बनवत होता. सारे गप्पा हाणत त्यावर ताव मारत होते. गप्पांचा विषय होता टॉर्चर कँप! तिथे क्रांतीवीरांना कशा नरक यातना सहन कराव्या लागतात, याविषयी चर्चा चालू होती. गप्पात भाग घेता येत नसला तरी आत रघुनाथला सारे ऐकू येत होते. जवळच त्याला एक लोखंडी कांब दिसली. ती त्याने धगधगत्या चुलीत सारली. रोट्या भाजण्याचे काम करताना तो अधून मधून तापलेल्या कांबीने स्वत:स डाग देऊन पुन्हा ती चुलीत सारत होता. दोन-तीनदा त्याने छातीवर डाग दिले. बराच वेळ असे चालले. अचानक कुणाचे रघुनाथकडे लक्ष गेले आणि तो किंचाळला "ये क्या पागलपन हैं?" मंद हसत रघुनाथ स्वत:च्या खास भंगड भाषेत उत्तरला, "पागलपन नाही, मै कितना सह सकुंगा, इसकी परीक्षा लेता हु." रघुनाथच्या देहावरील डागांनी उमटलेल्या असंख्य फोडांची रांगोळी पाहून कणखर आझादांचे डोळे पाणावले

हे खरे आहे की विविध कारणांनी चेष्टेचा विषय ठरणाऱ्या रघुनाथच्या अचूकता, समर्पण आणि देशभक्तीचा सारे आदर करत. पण साँडर्स हत्येवेळी त्याच्या चरमसीमेच्या अचूकतेचा आणि समर्पणाचा खरा परिचय घडला. झाले असे की सायमन कमिशनची कारवाई नक्की झाली त्या कमिशनमध्ये एकही भारतीय व्यक्तीस स्थान नव्हते. म्हणून पंजाब केसरी हा परिचय असलेल्या लाला लजपतराय यांनी लाहोरच्या मार्गावर विरोधाचा झेंडा रोवला. म्हणून स्कॉटच्या नेतृत्वाखाली साँडर्सच्या आदेशानुसार पोलिसांची तुकडी वयस्क लालाजींवर तुटून पडली. चेव आल्यागत सारे प्रहार करत सुटले. कुठे नि किती जोराने घाव घालावे, याचे भान उरले नाही. लालाजींच्या छातीवर, मस्तकावर भीषण प्रहार होत होते. लालजींची रक्तबंबाळ अवस्था क्रूर नजरेस दिसत नव्हती. त्यांचे प्राण घेऊनच प्रहारसत्र थांबले.

लालजींनी पत्करलेल्या हौतात्म्यास मानवंदना देण्यास नि क्रूर सरकारच्या नीच कृत्याचा निषेध करण्यास लाहोरला शोकसभा झाली. तिथे देशबंधू चित्तरंजनदास यांच्या पत्नीने गर्जना केली, "लालाजीकी राख ठंडी होनेसे पहले किसी भारतीय नौजवानने इस जुल्मका बदला लेना चाहिये." त्यांचा आवेश आणि स्वर-शब्द भगतसिंगला विव्हळ करून गेले. तो लालाजींच्या कलेवराशी झुकला. पदस्पर्श करून तो पुटपुटला - त्याने जात्या जीवास वचन दिले. नंतरच्या पार्टीच्या सभेत त्याने विशेष प्रस्ताव मांडला आणि तो मंजूर करून घेतला. उत्साही रघुनाथने त्या साहसात साथ देण्याचा निर्णय जाहीर केला. स्कॉटला मीच संपवेन, असा हट्ट धरला. एव्हढ्या मान्यवराची हत्या झाली की मामला कोर्टात जाणे अटळ! विचार हिंदी भाषेत मांडता न येणारा रघुनाथ स्वत:चे म्हणणे नीट सादर करू शकणार नाही, असे सांगून भगतसिंग विरोध करू लागला. राजगुरूला सदैव शहादत नावाची महेबुबा आपल्या आधी भगतसिंग गटवेल, अशी शंका! ती शंका ओठी आणून त्याने चक्क भांडण उकरून काढले. साऱ्यांनी तसे नसल्याचे समजावण्याचा खूप प्रयत्न केला. पण राजगुरू अजिबात बधला नाही. शेवटी या प्लानमध्ये त्याचा समावेश करावाच लागला.

जय गोपालला माल रोड पोलीस स्टेशनवर स्कॉट केव्हा येतो आणि जातो, ते नोंदण्याचे काम सोपले. चार दिवस तो ते करत होता. पण स्कॉट त्या रस्त्यावर फिरकला नाही. उत्साही उन्माद आणि अधीरता हे राजगुरुचे स्वभावविशेष! त्याला विलंब सहन होईना. त्याने न पाहिलेल्या स्कॉटविषयी आझादांपाशी अजब भाषेत इच्छा व्यक्त केली, "वो

कदाच अंदर बसला हो. अंदर जाकर मै उसे ठीक करके आता हुं." आझाद शिस्तप्रिय! योजनेबर-हुकुम सारे झाले पाहिजे असा त्यांचा आग्रह! त्यांनी दाहक नजरेने राजगुरूकडे बघितले. कठोर स्वरात ते पुटपुटले "चूप रहो. अगर लुकलुक करना हो तो पार्टी छोडके घर जाओ." हे अजिबात आवडणार नसल्याने राजगुरूने मिठाची गुळणी घेऊन आळीमिळी पसंत केली.

जय गोपालने इशारा करताच भगतसिंग आणि राजगुरू यांनी गोळ्या झाडून स्कॉटचा वध करावा. गोळीबाराचा आवाज ऐकून कुणी अधिकारी पोलीस स्टेशन बाहेर आला तर त्यास आझाद संपवतील, अशी योजना होती. पाचव्या दिवशी - १७ डिसेंबर १९२८ रोजी जय्यत तयारी करून प्रत्येकाने स्वत:ची जागा घेतली. पण त्या दिवशीही स्कॉट त्या रस्त्यावर गेला नाही. एक गोरा अधिकारी पोलीस ठाण्याबाहेर आला. लगेच तो मोटारसायकलवर आरूढ झाला. पाठी ऑफिसरला सुरक्षा पुरी पडण्यास हेड कॉंस्टेबल चरणसिंग! जयगोपालने इच्छित इशारा केला नव्हता. तरी एव्हढी तैनात आहे तो अधिकारी स्कॉटच असला पाहिजे असा राजगुरूने तर्क केला. भगतसिंगने स्कॉटला बघितले होते. म्हणून त्याने राजगुरूला इशारा करून सबुरीचा सल्ला दिला. पण योजना ठरली तेव्हाही सारे राजगुरूने यात भाग घेऊ नये, असे म्हणत होते. म्हणून त्याला डावलून हे श्रेय भगतसिंगने लुटावे, असे आपसात साऱ्यांनी ठरवलेले दिसते, असे राजगुरुस वाटले. मनात पुन्हा नेहमीचा संशय! भगतसिंगने एकट्याने शिकार करणे अर्थातच त्याला मंजूर नव्हते. ठरल्याप्रमाणे राजगुरू भगतसिंगच्या पुढच्या भागास होता. भगतसिंगचा इशारा कळला नसल्याचा आव आणून त्याने गोळी झाडली. त्याचा नेम अचूक! गोळीने अधिकाऱ्याच्या मस्तकाचा छेद उडवला. आरपार गेलेली गोळी पाहून हेड कॉंस्टेबल चरणसिंग चवताळला. त्याने त्वेषाने रिव्हॉल्वर परजले. तो काही करण्यापूर्वी आझादांच्या गोळीने त्याचा घास घेतला. आता स्कॉटची प्रतीक्षा करता येणार नव्हती. भगतसिंग पुढे झाला. कोल्ड पिस्तोल परजत त्याने गोळीबार केला. काही क्षण माल रोडवर साहेबलोक स्तब्ध आणि क्रांतीवीरांचा धिंगाणा, असे दृश्य साकार झाले.

गोळीबाराचा तुफानी आवाज ऐकून पोलीस ठाण्यातून काही अधिकारी बाहेर धावले. त्यात फर्न्स नावाचा अधिकारी होता. त्याने राजगुरुस शह दिला. राजगुरुने जोरदार प्रत्युत्तर देण्याचा करण्याचा बेत केला. पण रिव्हॉल्वर चालले नाही. तरी त्याचा उत्साह नि उन्माद ओसरला नाही. लगेच त्याला चूक जाणवली. त्याने ट्रिगरऐवजी रिव्हॉल्वरच्या फिरत्या चक्रावर चुकून हात दाबला होता. त्याला चूक सुधारावयाची संधी न देता, फर्न्स त्याच्या समीप पोहोचला. राजगुरू सतर्क होताच; त्याने वेगळा पवित्रा घेतला. इंग्रजांविषयी असलेला सारा तिरस्कार समग्रतेने राजगुरुच्या डोळ्यात उतरला. रंध्रारंध्रात रणरंग वाहता झाला. त्याने फर्न्सला कंबरेतून उचलले. त्वेषाने जोरात गरागरा फिरवत माल रोडवर भिरकावले. फर्न्स इतक्या जोराने रस्त्यावर आदळला की त्याला उठताच आले नाही. राजगुरूची नजर आसपास भिरभिरली. भगतसिंग दिसला नाही; पण त्याचे रिकामे मॅगझिन रस्त्यावर रझळताना दिसले. ते तिथे राहणे राजागुरूस अयोग्य वाटले. जीवावरचे साहस करून त्याने ते मॅगझिन मिळवले आणि मगच भरधाव धाव ठोकली.सुदैवाने त्याचे साहस दु:साहस सिद्ध झाले नाही.

राजगुरूच्या गोळीने घेतलेला बळी होता सॉंड्रस! तरी कुणास वाईट वाटले नाही. कारण लालाजींच्या छातीवर फटके मारणाऱ्यात त्याचा पुढाकार भगतसिंगने बघितला होता. फर्न्सला लोळवून राजगुरू पोलीस ठाण्याच्या दिशेस का धावला, ते आझादांना कळेना. ते गोंधळले. पण गोंधळण्याची चैन आपल्यासाठी नाही, याची त्यांना जाणीव होती. भेटू

तेव्हा बघू, असा विचार करून त्यांनी स्वस्थता प्राप्त करण्यात यश मिळवले. राजगुरू अड्ड्यावर पोहोचण्याआधी सारे पोहोचले होते. त्याला पाहून आझाद बेंबीच्या देठापासून ओरडले, "तू उधर उलटा कहा मरने गया था?" राजगुरूने शांतपणे भगतसिंगचे रिकामे मॅगझिन त्यांना दिले. आझाद राजगुरूच्या कामावर फिदा झाले; पण हे साहस पार्टीला किती महागात पडू शकले असते, या कल्पनेत ते शहारले. म्हणून त्यांनी राजागुरूस कानपिचक्या देण्यात अजिबात कसर सोडली नाही. त्यात जोर नसल्याचे राजगुरूस अलगद जाणवले. तो गालात हसला. सारे राजगुरूने आंधळे साहस करू नये, असे म्हणत होते. यावर राजगुरू तक्रारीच्या स्वरात म्हणाला, "मी पहिल्या फटक्यात अधिकाऱ्यास झोपवल्याचे स्पष्ट दिसत असून भगतसिंगने आठ गोळ्या फुकट घालवून मॅगझिन रिकामे का केले? त्याने ते केले नसते आणि तिथे पडले नसते तर मी उचलण्यास तिकडे धावलो असतो?" न बोलता आझादांनी केवळ त्याच्या पाठीवर धप्पा मारला. ती शाबासकी होती आणि आंधळे साहस न करण्याचा आदेशही!

सॉंड्रस हत्याकांड ब्रिटीश सरकारला प्रचंड धक्कादायक वाटले. मारेकऱ्यांना पकडण्यासाठी सरकार जीवाचे रान करत होते. लाहोरमध्ये वास्तव्य सुरक्षित नव्हते आणि सज्जड चौकी-पहाऱ्यास मुसंडी मारून बाहेर पडणे अवघड होते. पण सारे वीर अशक्य ते शक्य करण्यात तरबेज! सोंगे वठवण्यात बहुरुप्यास मागे टाकणारे! योजना तयार झाली.

अस्सल सरदार दिसणाऱ्या भगतसिंगचे मुंडण झाले. तो सरकारी इंग्रज ऑफिसरच्या भूमिकेस सज्ज झाला. शहीद भगवतीदास उर्फ भगवतीचरण व्होरा यांची पत्नी दुर्गादेवी बालक शचीनसह भगतसिंगचे कुटुंब नि ओबड धोबड राजगुरु या मान्यवर अधिकाऱ्याचा नोकर बनण्याचे ठरले. टुमटुमित पोट नि स्थूल देहाचे आझाद मथुरेचा पंडा बनले. जय्यत तयारी झाल्यावर उच्च अधिकाऱ्याच्या थाटात हे अनोखे कुटुंब लीलया लाहोर स्टेशनवर पोहोचले. तिथे फर्स्ट क्लास कंपार्टमेंटमध्ये या कुटुंबाची आणि नोकराची सामान्य कंपार्टमेंटमध्ये व्यवस्था होती. स्टेशनवर गाडी थांबली की नोकर (?) कुटुंबाची वास्तपुस्त करायला धावत असे. जागरूक सरकारच्या डोळ्यात धूळ झोकून सारे भर दिवसा लाहोर बाहेर पडले. त्यांनी कलकत्ता गाठले. मग सारे वेगवेगळे भूमिगत झाले.

भगतसिंग आणि दुर्गादेवी यांनी दीदी नावाने क्रांतीकार्य करणाऱ्या सुशीला मोहन यांचे घर गाठले. राजगुरूचा वेग आणि हिंमत कल्पनातीत! तो सरळ काशीस पोहोचला. पुनश्च निर्भय मनाने तरुणाईस लाठी-काठीचे प्रशिक्षण देऊ लागला. त्याने ३०-४० समर्पित तरुणांचा गट तयार केला. तो उत्तम तिरंदाजही होता. या गटास त्याने तिरांदाजीही शिकवणे सुरु केले. राजगुरूचे व्यक्तिमत्व अजिबात प्रभावी नव्हते. त्यामुळे त्याच्याकडे सहसा कुणाचे लक्ष जात नसे. स्वतःच्या कुरुपतेचा तसेच भंगड हिंदी-इंग्रजी भाषेचाही देशाच्या हितासाठी वापर करण्यात तो तरबेज होता. त्यामुळे त्याला हवे ते करताना अति सावधगिरी बाळगावी लागत नसे. सारे सुरळीत चालू असताना...

आपल्या देशास फार मोठा बरा न होणारा रोग! फंद-फितुरीचा! ज्याने शिवाजीस दगा दिला, संभाजीचा वध करवला आणि तात्या टोपे या विलक्षण सक्षम स्वातंत्र्यवीरास फाशीच्या तख्तावर झुलवले तोच हा रोग! स्वकीय म्हणवणारे अस्तनीतील निखारे फालतू आमिषास भुलून परकीयांना नको ती माहिती पुरवत होते. क्रांतीवीरांना संपवत होते. जो काय करतोय, इकडे सरकारी ऑफिसर्सचे कधी लक्ष गेले नाही आणि गेलेही नसते असा अलक्षित व्यक्तिमत्वाचा शाप ज्याने वरदान समजून शिरोधार्य ठरवला होता, तो शिवहरी राजगुरू उर्फ बापू उर्फ रघुनाथ पकडला गेला.

त्याच्यावर लाहोर ॲक्शन प्लानमध्ये सामील असण्याचा आरोप ठेवला गेला. बापूचे कार्य जाणून होते त्या काशीच्या प्रजाजनात त्याच्याविषयी अपार आदर! बापूस इंग्रजी आणि हिंदी भाषा येत नाही, त्यास ॲक्शन प्लानसारखे शब्द माहितही नाहीत, असे सांगून काशीच्या प्रजाजनांनी त्यास निर्दोष सिद्ध करण्याचा अकटो-विकटो प्रयास केला. विद्यार्थ्यांचे पालकही बापू फक्त मराठीच बोलतो, असे सांगत होते. बाजारातील व्यापारी, तो न बोलता वस्तू दाखवतो आणि पैसे समोर धरतो, तो हिंदी न येणारा गरीब ड्रील मास्तर आहे, म्हणून आम्ही त्याच्याकडून कधीही जास्त पैसे घेत नाही, असे सांगत होते. काशी विद्यापीठाचे पदाधिकारी त्यास दुजोरा देत होते. पण हिंदी भाषा न येणारी व्यक्ती काशीस राहू शकणार नाही, हा हेका सरकारी अधिकारी सोडत नव्हते. 'एक गंदी मछली पुरे तालाबको गंदा कर सकती हैं,' या नियमानुसार एक फितूर सर्व वीरांच्या देशभक्तीवर पाणी फिरवायला समर्थ होता. त्यात भर म्हणून पोलिसांनी काशीतील लोभी ब्राह्मण निवडून त्यास लालूच दाखवून साक्षीदार तयार केला.

पुढे साक्षीदार ब्राह्मणावर काशीत फार टीका झाली. त्यास नगरजनांनी वाळीत टाकले. एका संध्याकाळी बापुकडून लाठी-काठीचे प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनी कहर केला. राजगुरूच्या विरोधात साक्ष देणारा ब्राह्मण सांध्य संध्येस ब्रह्मघाटावर गेला तेव्हा काही तरुण काठ्या घेऊन पुढे सरसावले. त्यांनी या लोभी पोंगा पंडितास चौदावे रत्न दाखवले. तो पंधरा दिवस बिछान्यातून उठू शकला नाही. काशीच्या प्रजाजनांनी राजगुरूच नव्हे तर अनेक भूमिगत क्रांतीवीर तसेच अहिंसा आंदोलकांना निवांतपणदिले. राजगुरूस मदत करणारे मराठी-हिंदी परिवार आजही त्याचे गुणगान करताना रंगून जातात.

लाहोर ॲक्शन प्लानमध्ये गुंतून न पडता वा त्या संदर्भात शेखी न मिरवता रघुनाथ तरुणांच्या मनात देशप्रेमाची भावना रुजवत आणि वाढवत होता. त्याचा कैवार घेणाऱ्या बहुतेक काशीकरांना तो एव्हढे मोठे भीमकार्य करून आला आहे, याचा अभिनिवेश दूर, वासही येऊ नये इतके त्याचे वागणे साधे सरळ आणि निरहंकारी होते. त्यामुळे वास्तव कळल्यावर साधे सरळ वर्तन असणाऱ्या रघुनाथविषयी काशीकराच्या मनात असलेला आदर अनेक पटीने वाढला.

फितुरीमुळे रघुनाथला काशीस अटक झाली. लाहोर ॲक्शन प्लानचा घटक असल्याने त्यास लाहोर कोर्टात नेण्यात आले. तिथे त्याचा मित्र परिवार पोहोचलाच होता. साऱ्यांना पाहून रघुनाथला प्रेमाचे भरते आले. त्याने दणदणीत गर्जना केली, "इन्कलाब झिंदाबाद!" त्या गर्जनेचे अनेकानेक पडसाद उमटल्यागत सारे ओरडले, "इन्कलाब झिंदाबाद!" प्रत्येकासमीप जाऊन रघुनाथने गळाभेट घेतली. त्याच्या मुद्रेवर नव्हते पकडले जाण्याचे दु:ख की आता कोणत्या यातनेस सामोरे जावे लागेल, याचे भय! याला इथे खटला चालवण्यास आणले आहे की मित्रांना भेटायला, याचा पोलिसांना उमज पडेना. त्याच्या आगमनाने कोर्टाचे रुक्ष वातावरण बदलून टाकले. तुरुंगातही रघुनाथाचा वावर अत्यंत सहज असे.

फितुरीमुळे रघुनाथ तुरुंगात गेला. तिथे सारे सागरीत भेटले. तुरुंगात जेल अधिकाऱ्याना देशभक्तीचे डोस पाजण्याचा सारे आनंद घेत. राजगुरुच्या भयानक हिंदीतून निर्माण होणारे विनोद साऱ्यांचे मनोरंजन करत. राजगुरूचे मित्र एक शेर वारंवार म्हणत. त्याचा अर्थ काहीसा असा होता, "शहिदांची पवित्र रक्षा आमच्या सुरम्यात मिसळून आम्ही डोळ्यात काजळ रेखले आहे. म्हणून आमच्या नजरेत रोमांचाची अनोखी चमक दृग्गोचर झाली आहे." वर राजगुरूची फिरकी घेत ते म्हणत, पण आमच्या राजगुरूच्या नजरेत मात्र निव्वळ चमक आहे. रोमांच लवलेश नसलेली! त्यास

फक्त हौताम्य पत्करण्यास भरीस घालणारी! त्या फिरकी घेण्यातही राजगुरूच्या समर्पित भावनेचा काठोकाठ आदर असे. कारण सर्वांच्या मनात आग्र्याच्या एका प्रसंगाचे स्मरण ताजे होत असे....

आग्र्यास असताना एकदा या मंडळींनी थोडी मौज करण्याचा विचार केला. ताजमहालची सहल ठरवली. रघुनाथने ताजमहाल बघितला नव्हता. तरी त्याच्या मनात नव्हती तिळमात्र उत्सुकता की इच्छा! सारे जात असल्याने तो नाईलाजाने बरोबर जाण्यास तयार झाला. साऱ्यांनी त्याला सांगितले की जरी आत्ता ताजमहाल बघण्याची इच्छा नसली तरी ते धवलशुभ्र प्रेमशिल्प पाहून त्याला गझलचे शेर सुचले तर त्याने विनासंकोच सांगावे. तोंड वाकडे करत त्याने होकार दिला. त्याचवेळी आपल्याला शेर, बकरी, कुत्रे.... काहीही स्फुरण्याची मुळीच शक्यता नाही, हे त्याने स्पष्ट सांगितले.

ताजची सहल संपवून मुक्कामाच्या जागी पोहोचण्यास रात्र झाली. तरी साऱ्यांनी 'महेफिले मुशायरा'त उरली रात्र जागरण करण्याचे ठरवले. सारे आपापल्या परीने ताजच्या सौंदर्याच्य तसेच प्रेमभावनेच्या संदर्भात गझलचे शेर सादर करत होते. साऱ्यांचे सादरीकरण संपल्यावर आता जरा आडवे होऊ, अशी सूचना आली. कुणी रघुनाथला ताज महाल कसा वाटला वा काव्य स्फुरले का, ते विचारले नव्हते. म्हणून तो आपणहून त्याच्या भयंकर हिंदीत म्हशी-सारख्या स्वरात स्वत:चे अफलातून काव्य रेकू लागला, "अबतक नही मालूम था के इश्क क्या चीज हैं... सारे शब्द हिंदी होते म्हणून मित्रांनी 'बहोत खूब! बहोत खूब' म्हणत दाद देऊन पुढे काय ते जाणण्याची उत्सुकता प्रगट केली. रघुनाथने मिर्झा गालिबच्या तोऱ्यात हिट मारली, "रोजेको देखकर मेरे भी इष्काने बलवा (बंड) किया...." काही उमज न पडल्याने क्षणभर सारे स्तब्ध झाले. बलवा शब्द ऐकून विंचू चावल्यागत बटुकेश्वर दत्त कोलमडले. रिव्हॉल्वर परजून रघुनाथच्या हाती देत भगतसिंग किंचाळला, "गर तू मुझे जिंदा नही रखना चाहता, तो गोली मार दे यार. ऐसा न करना हो तो कमसे कम आगेकी जिंदगीमे कभी शेर, कुत्ते, बकरी, चित्त, गधा या और कुछ नही बनानेका मुझे वचन दे." वाईट वाटणे वा राग येणे दूर, रघुनाथला आता या पुढे कुणाला आपल्याकडून काव्याची अपेक्षा नसेल, याचा प्रचंड आनंद झाला.

राजगुरूस अटक होण्याआधी विदेशी सरकार क्रांतीवीरांना राजकैद्याचा सन्मान न देता अत्यंत हीन रीतीने वागवत असे. आमटी-भाजीत किडे आणि रोटीत खड्यांसह दळलेले गहू, असा प्रकार! राजकैद्याचा दर्जा मिळवण्यासाठी सर्व कैदी भूक हरताळवर उतरले. म्हणून सरकारने अन्नाचे स्तर सुधारले. रघुनाथ तुरुंगात आला, तेव्हा मिळणारे अन्न फार वाईट नव्हते. हळूहळू सरकार पुन्हा जातीवर गेले. परत भूक हरताळची गरज निर्माण झाली. त्यात रघुनाथ सहभागी असणे ही स्वाभाविक घटना! पण मागील वेळी हरताळ सुरु होतो न होतो तोच कुणी क्रांतीकारी मेला तर गहजब होईल, या भयाने सरकारने माघार घेतली होती.

या वेळी सरकार झुकण्यास अजिबात तयार नव्हते. आमरण उपोषणात कुणाचा मृत्यू होऊ नाही यासाठी सरकारने वेगळा पवित्रा घेतला. डॉक्टर्सच्या मदतीने क्रांतीवीरांच्या नाकात सिरींजने दूध भरण्याचा! सारे विरोध करत. जेलचा कामगारवर्ग त्यांना घट्ट धरून ठेवी आणि डॉक्टर्स आपले काम करत. राजगुरू जबरदस्त पळापळ करत असे. अर्धा पाऊण तासाच्या दमछाक करवणाऱ्या धावपळीनंतर तो हाती येई. नंतरही त्याचा दंगा चालू असे. त्यामुळे दूध सांडणे, सिरींज फुटणे असे प्रकार होत. उपोषणामुळे त्याची शक्ती हळूहळू क्षीण होत होती. क्षीण राजगुरूच्या शक्तीवर मात करून डॉक्टरांनी त्याच्या नाकात सिरींज खुपसण्यात यश मिळवले. त्याच्या तीव्र विरोधास न जुमानता त्यांनी

सिरींजच्या सहाय्याने एक शेर दूध त्याचा शरीरात ओतले. पण या जबरदस्तीत डॉक्टरची चूक झाली. दूध फुफ्फुसात गेले.  तो जबरदस्त आजारी पडला. त्यास मरणप्राय वेदना होत होत्या. तरी फाशीची शिक्षा जाहीर झालेल्या भगतसिंगला तो चेष्टेने म्हणत होता, "माझ्या आधी पकडला गेलास आणि माझ्या आधी फाशी जायचा तुझा बेत मला कळलाय. मी असे होऊ देणे शक्य  नाही." अशक्त राजगुरूचे वेदना-ग्रस्त शब्द ऐकणारे हेलावत. तुरुंगाचे अधिकारीही त्यास अपवाद नसत.

राजगुरू  जेलमध्ये मेल्यास प्रजा बंड पुकारील, या भयाने सरकारने त्याच्यासमोर हात टेकले.  सरकारने  त्याची प्रकृती सुधरावी यासाठी  अथक प्रयत्न सुरु झाले. प्रकृतीत सुधारणा झाली; पण बरा झालेला राजगुरू  वेगळाच होता. त्याच्या स्वभावातून चेष्टा-मस्करीचे उच्चाटन झाले. तो गप्प राहू लागला. त्याची भगतसिंगला न्याहाळणारी उदास नजर केविलवाणी वाटे. तो बरा झाल्यावर पुन्हा खटल्याचे काम सुरु झाले. ज्या दिवशी त्यास भगतसिंगबरोबर फाशी देण्याचा निर्णय कोर्टाने जाहीर केला; त्या दिवशी उदासीस दूर ढकलून तो  आनंदाने फुलला. कारण उपोषणात मरण आले नाही म्हणून त्याच्या मनात एक प्रश्न  घुसला होता... फाशीऐवजी काळ्या पाण्याची शिक्षा झाली नि भगतसिंग ‘पुढे’ गेला तर? हे परीक्षेत नापास होण्याजोगे लाजिरवाणे वाटत होते. भगतसिंगसंगे फाशी जायचे ठरले आणि  विशेष गुणवत्तेसह पास झाल्याच्या अनुभूतीने तो मोहरला. ते पाहून कोर्ट चकित झाले. प्रजेच्या मनात त्याच्याविषयी आदर होता, तो शतगुणित झाला.

तेवीस मार्च १९३१ रोजी सायंकाळी भगतसिंग,  सुखदेव यांच्या हातात हात घालून गात  गात वधस्तंभाकडे जाताना त्याच्या मुखावर उमटलेला तेजोमय आनंद त्यास अनोखे सौदर्य प्रदान करत होता. जल्लादाला शहारा यावा असे! त्याचे वीर मित्र त्यास शहादतका बेताब आशिक म्हणत. त्याने ते विशेषण सार्थ केले. जीवनयात्रा संपवण्यापूर्वी या तीन अनोख्या वीरांनी एकमेकांची गळाभेट घेतली. फाशीच्या दोरखंडाचे चुंबन घेऊन, ती वरमाला असावी अशा थाटात सर्वांनी फाशीचा दोर गळ्यात घातला. या वीरांचे मातृत्व धारण केले  त्या वीरमाता  धन्य!  या वीरांच्या पावलांच्या  स्पर्शाने पुनीत झाली ती भूमी  धन्य!!!!

**- स्मिता  भागवत**